# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३) शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दू.क्र.: ०२२-६२५४२१००/११०/१८८/१८९

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्र. मरातंशिमं/का-४०(परीक्षा विभाग)/२०२२/ १५८
दिनांक :- 11 AUG 2022

प्रति,
प्राचार्य,
मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था.

विषय :- **उन्हाळी २०२२ च्या परीक्षेच्या निकालाबाबत...**

संदर्भ :- १) मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०(परीक्षा विभाग)/F१/२०२२/०५३, दि. ०४.०४.२०२२.
२) मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०(परीक्षा विभाग)/F१/२०२२/७१, दि. २८.०४.२०२२.

मंडळामार्फत घेण्यात येणा-या उन्हाळी परीक्षा २०२२ च्या आयोजनाबाबत संदर्भ क्र. १ व २ च्या महत्वाच्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळवून उन्हाळी परीक्षा २०२२ घेण्यात आली होती. सदर उन्हाळी परीक्षा २०२२ चा निकाल दि. २९.०७.२०२२ रोजी परीक्षा नियमावलीनुसार जाहीर करण्यात आला आहे.

सदर निकाल जाहीर झाल्यानंतर प्रथम व द्वितीय वर्ष परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना कॅरीऑन देऊन पुढील वर्षात प्रवेशाची सुविधा उपलब्ध करुन द्यावी, विद्यार्थ्यांना Theory (TH) व Progressive assesstment (PA) यांच्या एकत्रित गुणाच्या आधारे विषयाचा निकाल उत्तीर्ण जाहीर करावा तसेच अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची लगेच पुर्नपरीक्षा घ्यावी, याबाबतची काही विद्यार्थ्यांची, संस्थांची तसेच संघटनांची निवेदने प्राप्त झालेली आहेत. तसेच याबाबत समाज माध्यमाद्वारे काही व्यक्ती विद्यार्थ्यांना विचलित करणारी वक्तव्य करीत आहेत.

**त्या अनुषंगाने सर्व संस्था प्रमुखांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.**

हिवाळी परीक्षा २०१९ नंतर प्रथमच उन्हाळी परीक्षा २०२२ ही प्रचलित पध्दतीने घेण्यात आलेली आहे. त्यापूर्वी उन्हाळी परीक्षा २०२०, हिवाळी परीक्षा २०२०, उन्हाळी परीक्षा २०२१ व हिवाळी परीक्षा २०२१ हया परीक्षा कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार विद्वत समितीच्या मान्यतेने MCQ Based online पध्दतीने घेण्यात आल्या होत्या. MCQ Based online पध्दतीने घेण्यात आलेल्या परीक्षेचे स्वरुप हे प्रचलित पध्दतीने घेण्यात येणा-या परीक्षेच्या स्वरुपापेक्षा पूर्णत: भिन्न होते. तसेच Online परीक्षा विद्यार्थ्यांनी ज्या ठिकाणी वास्तव्यास होते त्या ठिकाणावरुन स्वत:चे Device वापरुन दिल्या होत्या. त्यामुळे MCQ Based online पध्दतीने घेण्यात आलेल्या परीक्षेतील विद्यार्थ्यांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जास्त होते. सदर बाबी विचारात घेता प्रचलित पध्दतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी २०२२ परीक्षेच्या निकालाची तुलना MCQ Based Online पध्दतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षा २०२० व उन्हाळी २०२१ च्या परीक्षेच्या निकालाशी करणे संयुक्तीक होणार नाही. उन्हाळी परीक्षा २०२२ च्या निकालाची तुलना उन्हाळी परीक्षा २०१८ व उन्हाळी परीक्षा २०१९ च्या परीक्षेच्या निकालाशी करणे आवश्यक आहे.

उन्हाळी परीक्षा २०१८, उन्हाळी परीक्षा २०१९ व उन्हाळी परीक्षा २०२२ च्या निकालाचे विश्लेषण खालील तक्तात नमूद केले आहे.

| Exam | Total Student appeared | Distinction | First Class | Second Class | Pass class | Total Pass | Total % pass |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Summer 2018 | 553347 | 34575 (17.10%) | 106016 (52.42%) | 56922 (28.15%) | 4733 (2.34%) | 202235 | 36.55% |
| Summer 2019 | 510688 | 34515 (17.13%) | 106393 (52.81%) | 54582 (27.09%) | 5743 (2.85%) | 201451 | 39.45% |
| **Summer 2022** | **279435** | **28998 (27.77%)** | **66475 (63.66%)** | **8794 (8.42%)** | **154 (0.15%)** | **104421** | **37.37%** |

यावरुन उन्हाळी परीक्षा २०२२ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण उन्हाळी परीक्षा २०१८ व उन्हाळी परीक्षा २०१९ च्या प्रमाणेच असल्याचे स्पष्ट होते. उलटपक्षी उन्हाळी परीक्षा २०२२ मध्ये First Class व Distinction मध्ये उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाण उन्हाळी परीक्षा २०१८ व उन्हाळी परीक्षा २०१९ च्या तुलनेने वाढले असल्याचे स्पष्ट होते.

अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा २०१८, उन्हाळी परीक्षा २०१९ व उन्हाळी परीक्षा २०२२ मध्ये दिलेल्या परीक्षाबाबतचे विश्लेषण खालील तक्त्यात देण्यात येत आहे.

| Description of students at enrollment stage | Number students at the time of enrollment | Examination | Number of students appearing for final semester / year examination at the end of stipulated time | % of enrolled students appearing for final semester / year examination at the end of stipulated time | Pass percentage at final semester/year |
|---|---|---|---|---|---|
| Enrolled to first year and direct second year in 2015-16 and 2016-17 respectively. | 129825 | Summer 2018 | 55303 | 42.60 | 69.85<br>38629 out of 55303 |
| Enrolled to first year and direct second year in 2016-17 and 2017-18 respectively. | 107859 | Summer 2019 | 57724 | 53.52 | 61.38<br>35431 out of 57724 |
| Enrolled to first year and direct second year in 2019-20 and 2020-21 respectively. | 76913 | Summer 2022 | 63144 | 82.10 | 50.71<br>32020 out of 63144 |

**Note: If the enrolled students to first and direct second year during 2019-20 and 2020-21 respectively could have faced series of conventional examinations leading to summer 2022, then the approximate number of students reaching final semester / year can be assumed as 60% of 76913 at enrollment stage i.e. 46148. Accordingly the pass percentage at final semester / year could have been 69.39% (32020 out of 46148). This pass percentage is perfectly in line with the normal trend.**

उन्हाळी परीक्षा २०१८, उन्हाळी परीक्षा २०१९ व उन्हाळी परीक्षा २०२२ च्या निकालानंतर द्वितीय व तृतीय वर्षातील प्रवेशासाठी ATKT सह पात्र विद्यार्थ्यांची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

| Regular students appeared for Exam | % of Regular Students eligible for 3rd Semester in next Academic year | % of Regular Students Eligible for 5th Semester in next Academic year |
|---|---|---|
| Summer 2018 | 60.59 % | 55.71 % |
| Summer 2019 | 75.79 % | 56.19 % |
| **Summer 2022** | **73.57 %** | **64.97 %** |

उपरोक्त तक्त्यावरुन पुढील वर्षाकरिता पात्र होणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाण उन्हाळी परीक्षा २०२२ च्या निकालानंतर वाढले असल्याचे स्पष्ट होते.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता उन्हाळी परीक्षा २०२२ चा निकाल कमी प्रमाणात लागला यामध्ये तथ्य नाही. तसेच मागील चार Online पध्दतीने घेतलेल्या परीक्षेनंतर प्रथमत:च प्रचलित पध्दतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षा २०२२ करिता महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार विद्यार्थी हितास्तव खालील सुविधा विशेष बाब म्हणून विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या होत्या.

- उन्हाळी परीक्षा २०२२ च्या लेखी परीक्षेकरीता प्रत्येक तासाला १५ मिनिटे वाढीव वेळ देण्यात आली होती.
- नियमित सत्र वर्षातील प्रत्येक विषयाच्या लेखी परीक्षेच्या दोन पेपर दरम्यान किमान दोन दिवसांचे अंतर ठेवण्यात आले होते.
- मंडळामार्फत यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमधील विषयनिहाय प्रश्नपत्रिका तसेच विषयनिहाय नमूना प्रश्नपत्रिका Suggestive Question Bank म्हणून विद्यार्थ्यांना सरावासाठी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उन्हाळी परीक्षा २०२२ सुरु होण्यापूर्वी उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता संस्था प्रमुखांना सूचित करण्यात येते की, उन्हाळी परीक्षा २०२२ च्या निकालामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही. तसेच अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची पुर्नपरीक्षा घेण्यात येणार नाही याची संस्थांनी नोंद घ्यावी व आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना याबाबत अवगत करण्यात यावे. तसेच समाज माध्यमावरील चिथावणीस व वक्तव्यास बळी न पडण्याबाबत विद्यार्थ्यांना समुपदेशन करावे.

( डॉ. महेंद्र स. चितलांगे )
सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी –
मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी –
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद.